**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि १४ जून २०२३**

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३०५/२०२३ भादवि ३२४,३२३,५०४,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १२/०६/२०२३ रोजी १०.०० वा चे सुमारास, फिर्यादीचे राहते घरासमोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १३/०६/२०२३ रोजी २०.५५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | काजल किरण गुडील, वय- २५ वर्षे, रा. वैदवाडी, भवानी पेठ, शेळगी रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) किरण गोवींद गुडील- पती, २) गोवींद गुडील- सासरे, ३) दुर्गा गोवींद गुडील- दिर, सर्व रा. वैदवाडी, भवानी पेठ, शेळगी रोड, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीस फिर्यादीचा पती वरील आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीस वरातीत का नाचलीस या कारणावरुन पट्टयाने मारहाण केली सदर पट्टयाच्या स्टीलचा बक्कल व डाव्या पायाचे पंजावर लागुन जखम झाली आहे. तसेच फिर्यादीची आत्या अनिता रामा वरगंटी हि भांडण सोडविण्यासाठी आली असता तिला देखील फिर्यादीचे सासरे आरोपीत क्रं. २ यांनी कपाळावर हाताने जोरात ठोसा मारला आहे तसेच फिर्यादीची आई गुरव्वा शिवराल हि भांडण सोडविण्यासाठी आली असता तिला आरोपीत क्रं. ३ याने शिवीगाळ करुन हाताने मारहाण केली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ९९३ पैकेकरी - ७४१०११२९९३ |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३९३/२०२३ भादवि ३८० प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १२/०६/२०२३ रोजी २४.०० वा ते दि. १३/०६/२०२३ रोजी ०४.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १३/०६/२०२३ रोजी २२.२० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अंजय्या नागनाथ फलमारी, वय- ३६ वर्षे, रा. ३१ गडगी नगर हिरा मोती टॉवर शेजारी, जुना विडी घरकुल, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ११,०००/- रु त्यात एक सॅमसंग ए-२१ कंपनीचा मोबाईल व फायर बोल्ट कंपनीचे स्मार्ट वॉच व १५ नग लहान मोठे पितळी तांबे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे राहते घराचे भिंतीवर चढुन टेरेसवर येवून तेथुन जिन्याच्या उघडया दरवाज्यातुन आत प्रवेश करुन, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या राहते घरातील वरील वर्णनाचे साहित्य व फिर्यादीची बहिण वापरत असलेला मोबाईल हा फिर्यादीच्या संमतीवाचून, मुद्दाम चोरुन नेला आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १२७ पाटील - ९३५६६३६३४८ |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३७१/२०२३ भादवि २७९,३३७,३०४(अ), मोवाकाक १८४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १६/०५/२०२३ रोजी २१.४० वा चे सुमारास, सोलापूर पुणे हायवे वर साई लॉन्स ते |

| | | |
|---|---|---|
| | | रिक्षा स्टॉप कडे जाताना, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि १३/०६/२०२३ रोजी १८.३३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | मारुती रंगनाथ ठाकुर, वय- ५५ वर्षे, रा. क्रांती नगर सुशीलादेवी कॉलेज जवळ, खारगाव रोड, लातुर |
| **आरोपीचे नाव** | **:** | रमेश जगदीश मिरेखोर, रा. सैफुल, सोलापूर |
| **मयताचे नाव** | **:** | सरस्वती चंद्रकांत मोरे, वय- ६२ वर्षे, रा. १२९, जुनी लक्ष्मी चाळ, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व फिर्यादीची आत्या सरस्वती चंद्रकांत मोरे, असे दोघेजण नातेवाईक भगवान शिंदे यांचे मुलीचे केगाव येथील साई लॉन्स या ठिकाणी लग्न उरकुन जेवण करुन परत आत्याचे घराकडे जाणेसाठी केगाव येथील रिक्षा स्टॉपकडे पायी रस्ता क्रॉस करुन जाताना सोलापूर पुणे हायवे रोडवर यातील आरोपीत मजकुर याने त्याच्या ताब्यातील ॲक्टीव्हा मोटार सायकल क्रं एम एच १३ डी एच २६१६ हि भरधाव वेगात, हयगयीने, निष्काळजीपणाने चालवुन, फिर्यादीच्या आत्या हिस धडक देवून त्यात तिचे डोकीस, पायास, हातास, बरगडीस गंभीर दुखापत होवून जिचे मृत्युस व स्वतःचे उजवे हातास पायास पाठीला मुक्कामार लागुन, जखमी होणेस कारणीभुत ठरला आहे म्हणून. तपासः- पोसई- भोईटे - **७९७२११९७५१** |